दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बातम्या व जाहीरातीसाठी संपर्क 8421577797

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप |
उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

बीड महाराष्ट्र | रविवार | 28 डिसेंबर 2025 |
| अंक क्र. 221 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# धगधगत्या बांगलादेशाची भारतासाठी डोकेदुखी!

बांगलादेशात चिघळत चाललेल्या असंतोषामुळे भारताची डोकेदुखी दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. परवाच्या हिंसाचारात आक्रमक जमावाने ढाक्याच्या राजबारी जिल्ह्यात आणखी एका हिंदू तरुणाची मारहाण करून हत्या केली. त्याआधी जमावाने दीपू नावाच्या व्यापारी तरुणाची हत्या करून त्याचा मृतदेह झाडाला लटकवून जाळला होता. अत्यंत क्रूरपणे झालेल्या या दोन्ही हत्येचे पडसाद देशभरात उमटले. मुंबई, दिल्लीसह हिंदुत्त्ववादी संघटनांनी बांगलादेशी उच्चायुक्तालयासमोर उग्र निदर्शने करत आपला निषेध नोंदवला. परंतु या निषेधामुळे बांगलादेशातील हिंदूंच्या कत्तली आणि हिंदू कुटुंबांवर सुरू असलेले अत्याचाराचे सत्र थांबेल, असे कुणाला वाटत असेल तर तो निव्वळ वेडेपणा ठरेल. १९७१ मध्ये भारताच्या मदतीने जन्माला आलेला बांगलादेश आज भारतालाच डोळे दाखवतोय. पाकिस्तान, चीनशी जवळीक करतोय. 16 डिसेंबरला पाकिस्तानच्या सैन्यावर मात करून भारताने पूर्व पाकिस्तानला वेगळे करण्यात मदत केली. पुढे हाच पूर्व पाकिस्तान बांगलादेश म्हणून नावारूपाला आला. त्यामुळे हा दिवस विजय दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवशी भारताला धन्यवाद म्हणण्याऐवजी बांगलादेशच्या नागरिकांनी रस्त्यांवर उतरून भारतविरोधी घोषणा दिल्या, भारताची इशान्येकडील राज्ये (सेव्हन सिस्टर्स) तोडून टाकण्यासारखी चिथावणीखोर वक्तव्ये केली, भारतीय उच्चायुक्तालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना देशाबाहेर काढले, हिंदू अल्पसंख्याकांवर हल्ले, त्यांच्या क्रूर हत्या, प्रसार माध्यमांच्या कार्यालयांची जाळपोळ अशा एक ना अनेक प्रकारांमुळे भारत आणि बांगलादेशातील संबंध कधी नव्हे तेवढे बिघडले आहेत.

खरे तर गेल्या वर्षी म्हणजे २०२४ मध्ये, स्वातंत्र्यसैनिकांच्या कुटुंबातील सदस्यांना आरक्षण देण्याच्या विरोधात सुरू झालेल्या आंदोलनाचे देशव्यापी चळवळीत रूपांतर झाले होते. परिस्थिती इतकी बिकट झाली की बांगलादेश अवामी लिग पक्षाच्या प्रमुख व तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना यांना देशातून पळ काढून भारतात आश्रय घ्यावा लागला. शेख हसीना यांचे सरकार पडल्यानंतर इंग्लंडमधून आयात झालेले अर्थतज्ज्ञ मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखाली बांगलादेशात अंतरिम सरकार स्थापन झाले. या सरकारने देशात कायदा-सुव्यवस्थेपासून ते न्यायव्यवस्थेपर्यंत अनेक बदल केले. यानंतर बांगलादेशात शांतता नांदेल असे म्हटले जात असतानाच पुन्हा हिंसाचार उफाळून आला. यामागचे कारण म्हणजे 10 दिवसांपूर्वी भारतविरोधी गरळ ओकणारा कट्टरपंथी शरीफ उस्मान हादी व त्याच्या आणखी एका सहकाऱ्याचा गोळीबारात झालेला मृत्यू. भारताच्या इशाऱ्यावरच या हत्या झाल्याचा आरोप करत कट्टरपंथी पुन्हा रस्त्यावर उतरून भारताला लक्ष्य करू लागले. सुरुवातीला श्रीलंका, त्यानंतर नेपाळ आणि आता बांगलादेश. भारताच्या या तिन्ही शेजारी देशांमध्ये मागच्या दोन-तीन वर्षांमध्ये केवळ हिंसाचारच नाही, तर तख्तापालटही झालाय. सुरुवातीला या हिंसाचाराला जेन झीची चळवळ म्हणून पाहिले जात असले, तरी त्यामागे मोठे षडयंत्र असल्याचे दिसते.

हे षडयंत्र प्रामुख्याने भारताच्या प्रभावाखाली राहणाऱ्या लहान देशांना टार्गेट करून त्यांना राजकीयदृष्ट्या अस्थिर करणे, त्या त्या देशांतील लोकशाही व्यवस्थांचे खच्चीकरण करणे, त्या देशांना आर्थिकदृष्ट्या परावलंबी बनवणे आणि भारताच्या सीमा सतत धगधगत ठेवून भारताच्या प्रगतीत अडथळे निर्माण करणे हेच असल्याचे दिसते. त्यातल्या त्यात श्रीलंका थोडाफार सावरला असला, तरी नेपाळ आणि बांगलादेश आजही अशांतच आहे. या अशांततेचा फायदा एकीकडे पाकिस्तान आणि दुसरीकडे चीनच्या गुप्तहेर यंत्रणा बेमालुमपणे उचलत आहेत. भारताची आर्थिक प्रगती बघवत नसलेल्या अमेरिका आणि युरोपातील गुप्तहेर यंत्रणांचाही या हिंसाचारामागे हात असल्याचे म्हटले जात आहे. बांगलादेशातील मोहम्मद युनूसच्या अंतरिम सरकारची मुदत नव्या वर्षात संपत आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये बांगलादेशात सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. पण, त्याआधीच पुन्हा उफाळून आलेला हिंसाचार हा निव्वळ योगायोग नाही. बांगलादेशात शेख हसीना यांचा अवामी लिग आणि बांगलादेश नॅशनालिस्ट पार्टी (बीएनपी) असे दोनच पक्ष लोकशाहीच्या मार्गाने चालणारे पक्ष म्हणून ओळखले जातात. हसीना देशाबाहेर हद्दपार झाल्याने बांगलादेशच्या माजी राष्ट्राध्यक्ष खालिदा झिया यांचे पुत्र तारिक रहमान 17 वर्षांनी इंग्लंडमधून बांगलादेशात परतलेत. त्यांच्याकडे बांगलादेशचे भावी पंतप्रधान म्हणून बघितले जात आहे. प्रत्यक्षात या दोन्ही पक्षांना फुटीरतावाद्यांचा विरोधच आहे. या विरोधामागे प्रामुख्याने जमान-ए-इस्लामी नावाचा कट्टरपंथी पक्ष आहे. त्यालाच देशाच्या सत्तेत बसण्याची सुप्त इच्छा असल्याने या निवडणुका होऊच नये यासाठी ही सर्व धडपड सुरू आहे. मोहम्मद युनूस युरोप, अमेरिकेच्या हातचे बाहुले म्हणून कारभार बघत असले, तरी भारतविरोधी भूमिकेत त्यांचा मोठा हात आहे. भारत शेख हसीना यांना आश्रय देत राहिल्यास आम्हीही भारतातल्या फुटीरतावादी गटांना आश्रय देऊ असा त्यांनी इशारा दिलाय. ही भारतासाठी धोक्याची घंटा आहे. कारण, आधीच पाकिस्तानातून येणाऱ्या दहशतवाद्यांचा भारताला सामना करावा लागत असताना बांगलादेशही अतिरेक्यांच्या नियंत्रणाखाली आला तर जैश आणि लष्कर-ए-तैयबासारख्या दहशतवादी संघटनांना दुसरे घर मिळेल. भारताच्या पूर्वेकडील भागात अस्थिरता आणि दबाव निर्माण करण्याच्या उद्देशाने हे गट काम करू लागतील. भारतासाठी एक मोठी चिंता म्हणजे बांगलादेशसोबतची लांब आणि संवेदनशील सीमा. पश्चिम बंगाल, आसाम, त्रिपुरा आणि मेघालयाला लागून असलेली सीमा आधीच बेकायदेशीर घुसखोरी, तस्करीसाठी ओळखली जाते. सीमेपलीकडच्या भागात कट्टरपंथी संघटनांना पुन्हा उदयास येण्याची संधी मिळाली,

तर ही सीमा दहशतवादी, स्लीपर सेल आणि शस्त्रास्त्र तस्करीचा मोठा मार्ग बनू शकते, सध्या तरी भारताने बांगलादेशच्या कुठल्याही कृतीवर प्रतिक्रिया न देता शांत राहण्याचे धोरण ठरवले आहे. मात्र, किती वेळ शांत राहायचे त्यालाही काही सीमा असायला हवी. नाहीतर, हिंसाचाराच्या वणव्यात धगधगता बांगलादेश भारतीय सीमा अशांत केल्यावाचून राहणार नाही.

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना अंमलबजावणीमध्ये आष्टी मतदार संघ महाराष्ट्र राज्यात अग्रेसर राहावा..!

### प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या गावांना स्थानिक विकास योजनेतून निधी देणार : आ.सुरेश धस

■ आष्टी (प्रतिनिधी)

भारतरत्न नानाजी देशमुख यांनी आष्टी विधानसभा मतदारसंघातील पाटोदा तालुक्यातील डोमरी येथे गुरुकुलाची स्थापना केलेली असून गोंडा ते बीड या त्यांच्या कार्याशी मी पूर्वीपासून निगडित असून नानाजी देशमुख यांचे समवेत बैठकीच्या निमित्ताने त्यांचा सहवास लाभलेला आहे त्यामुळे त्यांच्या नावाने असलेल्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेच्या अंमलबजावणीमध्ये आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी या योजनेमध्ये सहभागी होऊन आपली आर्थिक स्थिती सुधारावी या योजनेचे समन्वयक, ग्राम समिती यांनी या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुका हा अंमलबजावणी मध्ये महाराष्ट्र राज्यामध्ये प्रथम क्रमांक वर अग्रेसर राहावा अशी आपली अपेक्षा आहे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले आष्टी येथे आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या वतीने सरपंच ग्राम समिती यांच्या कार्यशाळेमध्ये ते बोलत होते यावेळी व्यासपीठावर उपविभागीय कृषी अधिकारी श्री गरजे आष्टी तालुका कृषी अधिकारी श्री गोरक्ष तरटे पाटोदा आणि शिरूर तालुका कृषी अधिकारी उपस्थित होते पुढे बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले की "नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (पोकरा) हा केवळ सरकारी उपक्रम नसून शेतकऱ्यांच्या आर्थिक समृद्धीचा मार्ग आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील या योजनेचा दुसरा टप्पा आता सुरू झाला असून, आष्टी, पाटोदा आणि शिरूर मतदारसंघातील निवड झालेल्या गावांचा याद्वारे कायापालट होणार आहे. या योजनेत आपला मतदारसंघ राज्यात एक नंबरवर आणण्यासाठी सर्व लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांनी झोकून देऊन काम करावे," असे आवाहन करताना ते म्हणाले की आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या पहिल्या तीन क्रमांकावरील ग्रामपंचायत च्या सरपंचांना प्रोत्साहन पर स्थानिक



विकास निधीतून विकास कामांना निधी देण्यात येईल असेही त्यांनी शेवटी सांगितले

आष्टी येथील लक्ष्मी लॉन्स येथे नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत आष्टी, पाटोदा व शिरूर (का.) तालुक्यातील समाविष्ट गावांच्या ग्रामस्तरीय समिती पारदर्शकता आणि प्रत्यक्ष पाहणीवर भर द्यावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले आमदार धस पुढे म्हणाले की, "या योजनेतील लाभासाठी कृषी सेवकांनी गावात जाणे अनिवार्य आहे. कृषी सेवक गावात जातात की नाही याची खात्री करण्यासाठी त्यांना जीपीआरएस प्रणाली कार्यान्वित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. शेडनेट, फुलशेती आणि शेळीपालनासारख्या जोडधंद्यांतून गरीब कुटुंबांचे आर्थिक सक्षमीकरण व्हावे, हा मुख्य उद्देश आहे. मी स्वतः प्रत्येक गावात जाऊन योजनेच्या कामाची पाहणी करणार आहे."

### अधिकारी आणि मान्यवरांचे मनोगत

- उपविभागीय कृषी अधिकारी गर्जे (बीड): "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पहिला टप्पा यशस्वी झाला. आता दुसऱ्या टप्प्यात समितीतील राजकारण बाजूला ठेवून जास्तीत जास्त विकासकामे करण्यावर भर द्यावा."
- आष्टी तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे: "दुसऱ्या टप्प्यासाठी निवड झालेल्या गावांचे भाग्य उजळणार असून, शेतीपूरक व्यवसायांना यातून मोठी बळकटी मिळेल."
- सरपंच विघा गायकवाड: "वैयक्तिक लाभासोबतच जास्तीत जास्त सार्वजनिक आणि सामाजिक कामांवर या योजनेतून भर द्यावा."

### शेतकऱ्यांच्या सूचना आणि चर्चा

■ या कार्यशाळेत विजय मरकड यांनी योजनेची माहिती लोकांच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचवण्याची गरज व्यक्त केली. तसेच बाळासाहेब चौरे, महेश कराळे, दिनकर टेकाळे, मच्छिंद्र शेंडगे आणि युवराज गंडाळ यांनी विविध तांत्रिक विषयांवर आपल्या सूचना मांडल्या. विठ्ठल वारे यांनी ग्रामीण भागातील लसीकरण आणि पशुवैद्यकीय सोयींकडे लक्ष वेधले, तर गोरख झेड चुंबळी यांनी गाव समितीमधील त्रुटींकडे लक्ष वेधले.यावेळी सभापती किरण शिंदे पाटील, तालुका कृषी अधिकारी शेळके (पाटोदा), गोरख तरटे (आष्टी) व कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मराठी पत्रकार परिषदेच्या अंबाजोगाई शाखेने मागील 5 वर्षात केलेल्या कार्याची परिषदेने घेतली दखल

### आदर्श पत्रकार संघ म्हणून फेब्रुवारी 2026 रोजी कर्जत येथे होणार पुरस्कार वितरण

राज्यातील पत्रकारांची मातृसंस्था
मराठी पत्रकार परिषद
मराठी पत्रकारांची पहिली आणि सर्वसमावेशक एकमेव संघटना.

■ अंबाजोगाई प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद पत्रमहर्षी रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ आणि वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ च्या वतीने आदर्श पत्रकार संघ म्हणून अंबाजोगाई शाखेने मागील 5 वर्षात केलेल्या कार्याची परिषदेने दखल घेऊन अंबाजोगाई संघाची निवड केली असून फेब्रुवारी 2026 रोजी कर्जत येथे पुरस्कार देऊन पुरस्कार प्राप्त जिल्हा व तालुका संघास सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने जाहीर करण्यात आली आहे.

यां विषयी सविस्तर माहिती अशी की,अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने दरवर्षी देण्यात येणारया पत्रमहर्षी रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ आणि वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे.. परभणी जिल्हा मराठी पत्रकार संघाला 2025 चा आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.. बेला, चामोर्शी, नांदगाव-मनमाड, पनवेल, आंबेगाव, किनवट, संग्रामपूर, अंबाजोगाई आणि मुंबई उपनगर या तालुका संघांना आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार जाहीर करण्यात आल्याची घोषणा एस.एम. देशमुख आणि अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर यांनी केली आहे.. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने उत्कृष्ट कार्य करणारया जिल्हा आणि तालुका पत्रकार संघांना दरवर्षी पुरस्कारांनी गौरविले जाते.. आठ महसूल विभागातून प्रत्येकी एका तालुका संघाची निवड केली जाते..

### पुढील तालुका संघांना पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत..

- नागपूर विभाग : बेला तालुका पत्रकार संघ जिल्हा नागपूर
- नागपूर विभाग : चामोर्शी तालुका पत्रकार संघ, जि. गडचिरोली
- नाशिक विभाग : नांदगाव – मनमाड मराठी पत्रकार संघ जिल्हा नाशिक
- कोंकण विभाग : पनवेल महानगर प्रेस क्लब जि. रायगड
- पुणे विभाग : आंबेगाव तालुका पत्रकार संघ जि. पुणे
- लातूर विभाग : किनवट तालुका पत्रकार संघ जि. नांदेड
- संभाजीनगर विभाग : अंबाजोगाई तालुका पत्रकार संघ जि. बीड
- अमरावती विभाग : संग्रामपूर तालुका पत्रकार संघ जि. बुलढाणा
- कोल्हापूर विभाग : पलूस तालुका मराठी पत्रकार संघ जि. सांगली.
- मुंबई विभाग :उपनगर पत्रकार असोशिएशन,
- सन्मानपत्र, मानचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्कारांचे स्वरूप असून दरवर्षी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात येते.. पुरस्कार वितरणाचा हा सोहळा अत्यंत दणदणीत होतो.. राज्यभरातून किमान हजार पत्रकार या सोहळ्यासाठी उपस्थित असतात.

### अंबाजोगाई शाखेने मागील 5 वर्षात केलेल्या कार्याची परिषदेने घेतली दखल

■ मराठी पत्रकार परिषदेचे हल्ला विरोधी कृती समितीचे बीड जिल्हा निमंत्रक दत्ताजी अंबेकर व वैद्यकीय कक्ष प्रमुख डॉ राजेश इंगोले याचे मार्गदर्शना खाली माजी तालुका अध्यक्ष गजानन मुडेगाकर, तालुका अध्यक्ष प्रशांतजी लाटकर व सचिव विरेंद्र गुप्ता यांच्या मागील 5 वर्षाच्या कारकिर्दी मध्ये घेण्यात आलेल्या विविध उपक्रमा बद्दल छत्रपती संभाजी नगर विभागाचा तालुका पुरस्कार मराठी पत्रकार परिषदेने अंबाजोगाई तालुक्याला जाहीर केल्या मुळे मराठी पत्रकार परिषदे च्या सर्व आजी माजी पदाधिकाऱ्यांनी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा एस.एम.देशमुख, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर,विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, महिला आघाडी प्रमुख शोभा जयपूरकर, राज्य प्रसिध्दीप्रमूख संदीप कुलकर्णी, विभागीय सदस्य सुभाषजी चौरे, बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळंके, विलासजी डोळसे, रवी उबाळे यांचे विशेष आभार व्यक्त केले आहेत.



# केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेत ताकारी स्टेशन शाळेचे घवघवीत यश

■ शिराळा /प्रतिनिधी

केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेत वाळवा तालुक्यातील ताकारी स्टेशन शाळेने घवघवीत यश संपादन केले आहे. गोळा फेक मुलीमध्ये कु.आराध्या अजिंक्य पाटील या विद्यार्थिनीने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. कु.अन्वी शिवदास गिरी या विद्यार्थिनीने तृतीय क्रमांक पटकावला आहे. लांब उडी स्पर्धेत कु.आराध्या अंजिक्य पाटील हिने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. ५०×४ रिले स्पर्धेत श्रेया आयवळे, अनन्या पाटील, आराध्या पाटील, अनवी गिरी या मुलींच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला आहे. या सर्वांची तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ताकारी गावच्या सरपंच सौ. प्रा.प्रणाली पाटील,उपसरपंच पद्माकर पाटील शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भरत लोखंडे , उपाध्यक्षा सौ. पुजा घाडगे , शिक्षणतज्ञ श्री.बी.ए.पाटील,अमोल पाटील संतोष मोरे, सौ.क्षितिजा पाटील, सौ.तनुजा पाटील, तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.शोभा चव्हाण, सौ.शोभा यादव, सौ.ज्योती माने व वैभव सुर्यगंध स उपस्थित होते.

## महिला व शुद्रांना गुलाम बनविणारी मनुस्मृति वारंवार जाळली पाहिजे : अनिताताई रोडे

■ परळी/ प्रतिनिधी



महिला व शुद्र,अतिशुद्रांना गुलाम बनविणारी मनुस्मृति वारंवार जाळली पाहिजे असे प्रतिपादन अनिताताई रोडे यांनी केले.मनुस्मृती दहन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. माणसा माणसात भेद निर्माण करणारा आणि विषम समाज व्यवस्थेची पायाभरणी करणारा मनुस्मृति ग्रंथ महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 25 डिसेंबर 1927 रोजी महाड येथे जाळला होता. हा दिवस परळी येथे महिलांच्या हस्ते मनुस्मृती जाळून साजरा करण्यात आला.

परळी शहरातील रेल्वे स्टेशन परिसरातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोरील प्रांगणात काल रात्री मनुस्मृती दहन दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ नेते भास्कर नाना रोडे होते.प्रथम महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास महिलांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.त्यानंतर सामुहिक त्रिशरण, पंचशीला ग्रहण करण्यात आली. तसेच याप्रसंगी उपस्थित अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच परळी तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी रानबा गायकवाड व कार्याध्यक्ष पदी संपादक नितीन ढाकणे यांची निवड झाल्याबद्दल सम्राट अशोक विचार मंच यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

फुले -आंबेडकरी अभ्यासक भगवान साकसमुद्रे म्हणाले की, संवैधानिक नैतिकता व संवैधानिक मूल्यांची मशागत ही निरंतर उपक्रमातून निर्माण होणारी प्रक्रिया आहे , जातीग्रस्त भेदभावातून समताधिष्ठ व मानवी चेतना व बुद्धीचे या उद्देशासाठी सार्वजनिक मनुस्मृती दहन निरंतर व वारंवार या कार्यक्रमास प्रा विलास रोडे,अशोक वाघमारे, गंगाधर रोडे, चिंतामणी खंडागळे, वैजनाथ जगतकर, मिलिंद घाडगे, सुनील कांबळे,नवनाथ दाणे, सिद्धार्थ जगतकर,सोपान निलेवाड सर, वसंत बनसोडे, .मिलिंद बनसोडे, मुक्ताराम गवळी, विजयकुमार गोदाम, राजेश सरवदे,भीमशाहीर सुर्यवंशी,अनिता रोडे, सुनंदा किवन्दे, द्वारका रोडे आदी महिला, पुरुष उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रस्ताविक भगवान साकसमुद्रे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.दासू वाघमारे यांनी केले.



## नारंगी बायपास रस्त्यावरील दुभाजकांची अवस्था दिवसेंदिवस खराब

■ वसईः वृत्तसंस्था

विरार पूर्वेकडील नारंगी बायपास रस्त्यावरील दुभाजकांची अवस्था दिवसेंदिवस खराब होत चालली आहे. दुभाजकांची नियमित देखभाल व वेळेवर दुरुस्ती न झाल्यामुळे अनेक ठिकाणी ते तुटलेल्या व धोकादायक अवस्थेत आहेत. याचा थेट फटका वाहनचालकांना तसेच पादचाऱ्यांना बसत असून अपघातांची शक्यता वाढली आहे.

वसई- विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीत बहुतांश प्रमुख रस्त्यांवर दुभाजक उभारण्यात आले आहेत. मात्र, नारंगी बायपास रस्त्यावर असलेल्या दुभाजकांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे. दुभाजकांवरील झाडे झुडूपांची देखभाल न केल्याने ती सुकून गेली असून परिसराचे सौंदर्यही कमी झाले आहे. याशिवाय दुभाजकांवरील रंग पूर्णपणे फिका पडल्याने रात्रीच्या वेळी ते स्पष्ट दिसत नाहीत. परिणामी, दुचाकी व चारचाकी वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. स्थानिक नागरिक व वाहनचालकांनी याबाबत तक्रारी करूनही अद्याप ठोस कार्यवाही झालेली नाही. या दुरवस्थेमुळे किरकोळ अपघातांचे प्रमाण वाढले आहे. काही भागातील दुभाजक तुटल्यामुळे वाहनचालक कशीही गाडी चालवतात, यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होते आणि अपघात होण्याची शक्यताही वाढते.

या पार्श्वभूमीवर संबंधित विभागाने तातडीने दुभाजकांची दुरुस्ती करावी, नव्याने रंगकाम करावे तसेच दुभाजकांवरील झाडे झुडूपांची वेळोवेळी पाहणी करावी. तसेच अनेक ठिकाणी या दुभाजकांवरील दिवे पूर्णपणे बंद आहेत किंवा अर्धवट पेटतात, त्यामुळे रात्री रस्त्यावर अंधार पसरतो. कमी प्रकाशामुळे वाहनचालकांना समोरील वाहने, दुभाजक व वळणे नीट दिसत नाहीत. प्रशासनाने या समस्येकडे लक्ष द्यावे आणि त्वरित उपाययोजना करावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## लोकार्थ









### भारती एअरटेल कंपनीच्या नेतृत्वबदलाची घोषणा

भारती एअरटेलने सांगितले की, सध्याचे सीईओ असलेले शश्वत शर्मा १ जानेवारी २०२६ पासून कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) म्हणून पदभार स्वीकारणार आहेत.भारतातील दुसऱ्या सर्वात मोठ्या दूरसंचार कंपनीच्या संचालक मंडळाने, भागधारकांच्या मंजुरीच्या अधीन राहून, उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक गोपाल विट्ठल यांची १ जानेवारी २०२६ पासून पाच वर्षांसाठी कार्यकारी उपाध्यक्ष म्हणून नियुक्तीलाही मंजुरी दिली आहे. विठ्ठल डिजिटल व तंत्रज्ञानासंबंधीच्या कामकाजांसह विविध निर्णय प्रक्रियेत सहभागी असतील. यात नेटवर्क धोरण, विविध कामकाजांविषयीची खरेदी प्रक्रिया तसेच मानव संसाधन या विविध विभागांच्या कामकाजांचे समन्वय साधणे तसेच या सर्व प्रक्रियेत समूहाची एकात्मता वाढवणे आदी कामकाजांचा समावेश असेल. समूहाची धोरणात्मक दिशा ठरवणे आणि संस्थेला भविष्यातील बदलांसाठी सक्षम तसेच सज्ज करणे यावर त्यांचा विशेष भर देतील. भविष्यकालीन नवकल्पना, तांत्रिक प्रगती आणि दीर्घकालीन वाढ हे सुनिश्चित करण्यासाठी गोपाळ विठ्ठल यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

### मॉडर्न डायग्नोस्टिकचा आयपीओ खुलणार 31 डिसेंबर 2025 रोजी

भारतातील डायग्नोस्टिक व हेल्थकेअर चाचणी क्षेत्रातील अग्रगण्य मॉडर्न डायग्नोस्टिक अँड रिसर्च सेंटर लिमिटेड 31 डिसेंबर 2025 रोजी आपला आयपीओ गुंतवणूकदारांसाठी खुला करत आहे. 40,99,200 इक्विटी शेअर्सच्या फ्रेश इश्यूद्वारे ₹36.89 कोटी (वरच्या किंमत बँडवर) उभारण्याचा कंपनीचा मानस असून, हा आयपीओ बीएसई एसएमई प्लॅटफॉर्मवर सूचीबद्ध होणार आहे. प्रत्येकी ₹10 अंकित मूल्य असलेल्या शेअर्ससाठी किंमत बँड ₹85 ते ₹90 प्रति शेअर निश्चित करण्यात आला आहे.शेअर वाटपाचा आराखडा अँकर क्यूआयबी 11,61,600 पर्यंत शेअर्स, पात्र संस्थात्मक गुंतवणूकदार– 7,82,400 पर्यंत शेअर्स,नॉन-इन्स्टिट्यूशनल गुंतवणूकदार किमान 5,85,600 शेअर्स,खाजगी (रिटेल) गुंतवणूकदार – किमान 13,63,200 शेअर्स आणि मार्केट मेकर – 2,06,400 शेअर्स असा असेल.आयपीओतून मिळणाऱ्या शुद्ध उत्पन्नाचा उपयोग डायग्नोस्टिक केंद्रे व प्रयोगशाळांसाठी वैद्यकीय उपकरणांच्या खरेदीसाठी भांडवली खर्च, वर्किंग कॅपिटलची गरज, कंपनीने घेतलेल्या काही प्रलंबित कर्जांच्या परतफेडीसाठी तसेच सामान्य कॉर्पोरेट उद्देशांसाठी करण्यात येणार आहे.

बतमी -३]स्टेलेंटिस इंडिया आणि मुस्कान फाउंडेशनचा 'सेफ जर्नी' रस्ते सुरक्षा कार्यक्रम भारतात दरवर्षी १,६०,००० हून अधिक लोकांचा रस्ते अपघातात मृत्यू होतो. तेलंगणामध्ये, २०२३ मध्ये ७,६६० आणि २०२४ मध्ये ७,२८१ मृत्यू झाले. या पार्श्वभूमीवर, या मोहिमेचा उद्देश कुटुंबे आणि तरुणांमध्ये सुरक्षित रस्ते वर्तनाकडे सांस्कृतिक बदल घडवून आणणे हा आहे. सहा सरकारी महाविद्यालयांमध्ये एक सर्वसमावेशक रस्ते सुरक्षा शिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे, ज्यामध्ये अभिमुखता सत्रे, संरचित प्रशिक्षण आणि आपत्कालीन प्रतिसाद कार्यशाळा यांचा समावेश आहे.उच्च शिक्षण आयुक्तालयासोबत औपचारिक सामंजस्य कराराद्वारे रस्ते सुरक्षा क्लबची स्थापना करण्यात आली आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखालील सततच्या उपक्रमांना आणि कार्यक्रमाच्या दीर्घकालीन मालकीला चालना मिळेल.या कार्यक्रमाद्वारे १,२०० हून अधिक विद्यार्थी आणि प्राध्यापकांना थेट सहभागी करून घेण्याचे उद्दिष्ट आहे, तर समवयस्कांच्या नेतृत्वाखालील जागरूकता मोहिम आणि क्लबच्या उपक्रमांद्वारे १०,००० हून अधिक व्यक्तींवर परिणाम होण्याची अपेक्षा आहे.हैदराबाद, १८ डिसेंबर २०२५: स्टेलेंटिस इंडियाने, मुस्कान फाउंडेशन फॉर रोड सेफ्टीच्या भागीदारीत, हैदराबादमध्ये 'सेफ जर्नी' मोहीम सुरू केली आहे, ज्यामुळे सुरक्षित गतिशीलता परिसंस्था निर्माण करण्याच्या आपल्या वचनबद्धतेला बळकटी मिळाली आहे. हा उपक्रम विद्यार्थी, शिक्षक आणि स्थानिक अधिकाऱ्यांना एकत्र आणून रस्ते सुरक्षेच्या जागरूकतेचे रूपांतर चिरस्थायी सामुदायिक कृतीत करतो.

### इंस्टामार्टच्या वार्षिक ग्राहक ट्रेंड अहवालात मुंबईकर आघाडीवर

:सतत धावणारी गती आणि रोजच्या सवयींसाठी ओळखली जाणारी देशाची आर्थिक राजधानी मुंबई, देशातील सर्वाधिक सातत्यपूर्ण आणि उच्च वारंवारतेच्या क्विक कॉमर्स वापराचा ट्रेंड घडवत आहे. भारतातील अग्रगण्य क्विक कॉमर्स प्लॅटफॉर्म इंस्टामार्टच्या वार्षिक ग्राहक ट्रेंड अहवालाच्या पाचव्या आवृत्तीत हाऊ इंडिया इंस्टामार्टेड 2025 मध्ये हे चित्र समोर आलं आहे. अहवालानुसार, एका ग्राहकाने तब्बल 226 ऑर्डर्समध्ये एनर्जी ड्रिंक्सवर 16.3 लाख रुपये खर्च केले, तर प्रीमियम खरेदीत मोठी वाढ दिसून आली. केवळ सोन्याच्या खरेदीवरच 15.16 लाख रुपये खर्च झाल्याचंही या अहवालात नमूद करण्यात आलं आहे. या शिस्तबद्ध खरेदीसोबतच मुंबईत खर्चाच्या अतिशय टोकाच्या आणि ठळक पॅटर्न्सही पाहायला मिळाले. प्रीमियम खर्चातही मुंबईकर आघाडीवर राहिले असून, प्लॅटफॉर्मवर अनेक वापरकर्त्यांनी वर्षभरात 10 लाख रुपयांहून अधिक खर्च केल्याचं समोर आलं आहे.2025 मध्ये मुंबईने इंस्टामार्ट वरील सर्वाधिक सवयीवर आधारित पण उच्च-मूल्य शहर म्हणून वेगळी ओळख निर्माण केली. रोजच्या गरजेची पुनरावृत्ती आणि ठळक मोठे खर्च यांचा अनोखा मेळ मुंबईत पाहायला मिळाला.

■ संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

## संपादकीय

# मराठवाड्यातील महापालिका कोणाच्या?



महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया मंगळवारपासून सुरू झाली; परंतु राज्याच्या सत्तेत असणाऱ्या शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील युतीच्या चर्चा आणि गुऱ्हाळ काही केल्या संपत नाहीये. मराठवाड्यातील जालना, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणीत युतीसाठीच्या आतापर्यंतच्या बैठका वांझोट्या ठरल्या आहेत. मात्र लातूरमध्ये भाजप आणि राष्ट्रवादीचे जमतेय असे चित्र आहे.

मराठवाड्यात असलेल्या आठ जिल्ह्यांपैकी पाच ठिकाणी महानगरपालिका अस्तित्वात आहे. छत्रपती संभाजीनगर, नांदेड, लातूर, परभणी व जालना या ठिकाणी निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. मराठवाड्यात नगर परिषद व नगरपंचायत निवडणुकीचा आखाडा चांगलाच रंगला होता. आता महापालिका निवडणुकीतही तसेच चित्र पाहावयाला मिळणार आहे. महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने राज्यात राजकीय पटलावर रोज चित्र बदलत आहे. त्यामुळे मराठवाड्यातही वेगवेगळ्या राजकीय चर्चांना उधाण आले आहे. मराठवाड्यातील महानगरपालिका ताब्यात घेण्यासाठी सत्ताधारी व विरोधी पक्षांमध्ये चुरस निर्माण झाली आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका वगळता अन्य ठिकाणी त्या त्या महानगरपालिकांची आर्थिक स्थिती कमकुवत आहे. त्यामुळे महानगरपालिका क्षेत्रातील विकासासाठी राज्याच्या निधीवर अन्य महापालिकांना अवलंबून राहावे लागते. त्याचा फटका निवडणुकीत उमेदवारांना बसतो. गेल्या चार वर्षांपासून प्रशासक असल्याने अनेकदा नगरसेवकांची कमतरता जाणवली नाही. असे असले तरी महानगरपालिकेचा आखाडा मराठवाड्यात कोण पटकावणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

निवडणूक आयोगाने महापालिका निवडणुकांची घोषणा करताच आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. त्यानुसार, राज्यातील २९ महापालिकांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. मराठवाड्यातील सर्वात मोठी महानगरपालिका म्हणून छत्रपती संभाजीनगरची महापालिका आहे. संभाजीनगर महापालिकेतील सदस्य संख्या ११३ एवढी असून त्यापाठोपाठ नांदेड-वाघाळा महापालिका ८१, लातूर ७० आणि परभणीसाठी ६५ सदस्यसंख्या आहे, तर नव्याने झालेल्या जालना महापालिकेतील सदस्य संख्या ६५ एवढी आहे. महापालिका निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्यानुसार नामनिर्देशन पत्र ३० डिसेंबरपर्यंत दाखल करता येणार आहेत. अर्जाची छाननी ३१ डिसेंबर, उमेदवारी माघारीची मुदत २ जानेवारी, चिन्ह वाटप आणि अंतिम उमेदवार यादी ३ जानेवारी रोजी जाहीर करण्यात येणार आहे, तर मतदान १५ जानेवारी रोजी होणार आहे, तर निकाल १६ जानेवारी रोजी जाहीर करण्यात येणार आहे. नगर परिषद व नगरपंचायत निवडणुकीत मराठवाड्यात सत्ताधारी भाजप, एकनाथ शिंदे गट तसेच राष्ट्रवादी काँग्रेसने चांगलीच मजल गाठली. त्यामुळे पुन्हा या पक्षातील उमेदवारच मराठवाड्यात सर्वाधिक संख्येने निवडून येतील, असे मानले जात आहे; परंतु या तिन्ही पैकी कोणत्या पक्षाचे नगरसेवक व महापालिका विजयात पुढे राहतील याबद्दल मराठवाड्यात उत्सुकता आहे. उद्धव ठाकरे व राज ठाकरे हे एकत्र महानगरपालिका निवडणूक लढविणार असले तरी त्या दोघांची शक्ती मराठवाड्यात काही वेगळी जादू करेल असे वाटत नाही. शेवटी राज्यात व केंद्रात कोणाची सत्ता आहे व मराठवाड्यातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या महानगरपालिका परिसरांचा विकास निधी कुठून येणार आहे, याचाही सजग मतदार नक्कीच विचार करेल यात शंका नाही. शेवटी महानगरपालिका निवडणूक असल्याने आपल्याला कोणता नगरसेवक कामाचा राहील याचाही विचार मतदार राजा करणार आहे.पैशातून सत्ता आणि सत्तेतून पुन्हा पैसा हे आजच्या राजकारणाचे मूळ सूत्र झाले आहे. त्यामुळे कोणतीही निवडणूक म्हटली की, त्यामध्ये पैशाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. मराठवाड्यातील पाच महानगरपालिका आपल्या ताब्यात याव्यात यासाठी सर्वच पक्षांकडून 'लक्ष्मी दर्शनाची' सोय केली जात आहे. नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुका कार्यकर्त्यांच्या असल्या तरी त्यामध्ये नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत आपल्या ताब्यात सत्ता घ्यावी, या उद्देशाने साम-दाम-दंड-भेद या नीतीचा वापर करण्यात आला. मराठवाड्यात नगर परिषद व नगरपंचायत निवडणुकीत काही राजकीय पक्षांकडून पैसे वाटप करताना टोकन पद्धती अवलंबण्यात आली होती.

मराठवाड्यात पाच ठिकाणी महानगरपालिका निवडणुकीत प्रत्येक झोनसाठी निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. त्यांना स्वतंत्र कार्यालय व सोयी-सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. निवडणुकीसाठीच्या उमेदवारी अर्जाचे वितरण आणि स्वीकृतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. प्रत्येक ठिकाणी इच्छुक उमेदवारांची संख्या मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. संपूर्ण मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर येथील महानगरपालिका ही मराठवाड्याच्या तुलनेतील श्रीमंत महापालिका म्हणून ओळखली जाते; परंतु अन्य महापालिकांच्या बाबतीत विकासाचा वेग मंद आहे. आर्थिक स्थैर्य नसल्याने प्रशासनात हवी तशी कार्यक्षमता दिसून येत नाही. विकास निधीसाठी नेहमीच मुंबईकडे नजरा लावून बसाव्या लागतात. तेथून निधी मंजूर झाला तरच मराठवाड्याच्या महानगरपालिकेत विकासाची चक्रे सुरू होतात. त्यामध्येही भ्रष्टाचाराचे प्रमाण जास्त असल्याने विकासकामे कोणत्या दर्जाची होतील, याचा अंदाज लावता येतो. म्हणून निवडणुका आल्यावर उमेदवारांना राज्यातील शासनकर्त्यांच्या भरोशावर आश्वासन द्यावे लागतात.

मराठवाड्यातील महापालिका ताब्यात घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी यंत्रणा कामाला लावली आहे. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी देखील आपापल्या पदाधिकाऱ्यांना तसेच आमदारांना यासाठी कानमंत्र दिला आहे. दुसऱ्या बाजूने काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मराठवाड्यात विशेष लक्ष केंद्रित करत स्वतःचे दौरे वाढविले आहेत. काँग्रेसचे खासदार तसेच आमदार महानगरपालिका निवडणुकीत विशेष लक्ष देत आहेत. जाती-धर्माच्या आधारावर मतांची विभागणी होणार असल्याने एमआयएम या पक्षाने मराठवाड्यातील नांदेड तसेच छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीत स्वतःच्या उमेदवारांची यादी जवळपास निश्चित केली आहे. त्यामुळे भाजप-शिंदे गट-अजित पवार यांची राष्ट्रवादी यांच्यासह सत्ताधारी पक्षातील मित्रपक्ष, काँग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरे गट व एमआयएम अशी चुरस या निवडणुकीत दिसणार आहे. या पक्षाकडून तिकीट न मिळाल्याने अनेक जण अपक्ष म्हणून निवडणूक लढविण्याची तयारी करत आहेत. या सर्व राजकीय आखाड्यात मराठवाड्यातील पाच महानगरपालिका कोणाच्या? हे जानेवारी महिन्यात निकालानंतरच स्पष्ट होणार आहे, हे मात्र निश्चित.



# कारखेल(बु) जिल्हा परिषद शाळेत बाजार मेळावा संपन्न

**कडा | प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कारखेल(बु) येथे महान गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंती महोत्सवानिमित्त आनंददायी शनिवारी शालेय विद्यार्थ्यांनी फळे, भाजीपाला, रानमेवा, नाष्ट्याचे पदार्थ, किराणा दुकान,शालेय स्टेशनरी इ.साहित्यासह शालेय आनंदी बाजार भरविला.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये गणिती आकडेमोड,पैशांची देवाणघेवाण, व्यावसायीक कौशल्य, संभाषण कौशल्य तसेच व्यावहारिक ज्ञान निर्माण व्हावे आणि गणिती क्रियांचा व्यवहारात उपयोग यासाठी आनंददायी शनिवार  या उपक्रमाच्या माध्यमातून भव्य बाजार मेळावा संपन्न झाला.

शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी रानमेवा बिबव्या, चिंचा, आवळा, कवठ, बोरं, संत्री, मोसंबी, कोहिरी ,फळभाज्या, पालेभाज्या, औषधी वनस्पती तसेच भजे, भेळ, वडापाव, चहा-पोहे असे खाऊचे भव्य स्टॉल लावले होते. या बाजार मेळाव्यासाठी पालक, माताभगीनी तसेच गावातील शिक्षणप्रेमी अबालवृध्द नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थी आपल्या मालाची जाहिरात करत होते आणि तर पालक विद्यार्थ्यांशी व्यावहारीक चर्चा करून भरपूर खरेदीचा आनंद लुटत होते. पत्रकार समिर शेख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पालकांनी शाळेच्या या उपक्रमाचे तसेच  शाळेचे मुख्याध्यापक डॉ.अशोक उढाणे, मंजुषा बोंद्रे, मनिषा होळकर,मनिषा जिवडे,आशा पवार या शिक्षकवृंदाचे आणि सर्व विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले.

यावेळी कारखेल(बु) चे सरपंच,उपसरपंच, सर्व ग्रा.पं.सदस्य, शाळा व्य. समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष सर्व सदस्य आणि मोठ्या संख्येने मातापालक तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# गंगाई -बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्कारांचे बुधवारी वितरण : प्राचार्य डॉ.दत्तात्रय वाघ

रौप्य महोत्सवी २५ वा गंगाई-बाबाजी महोत्सव डिसेंबर २०२५

SHETKARI SHIKSHAN PRASARAK MANDAL

**आष्टी (प्रतिनिधी)**

सोमवार दि.२९ डिसेंबर २०२५ ते १ जानेवारी २०२६ या कालावधीमध्ये संपन्न होत असलेल्या गंगाई-बाबाजी रौप्य कला महोत्सवामध्ये दोन दिवस राज्यस्तरीय गंगाई- बाबाजी आदर्श पुरस्काराचे वितरण होणार आहे. यामध्ये बुधवार दि.३१ डिसेंबर रोजी सकाळी १०. ३० वाजता सामाजिक क्षेत्र,पत्रकारिता व शिक्षण क्षेत्र (माध्यमिक व उच्च माध्यमिक)  या पुरस्कारांचे वितरण होणार आहे.इतर सर्व क्षेत्रातील पुरस्कार वितरण दि.१ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता होणार आहे.

### सामाजिक विभाग

रणजित चव्हाण, श्रीमती वर्षा आजिनाथ शेरकर, समीर बादशहा शेख,रहेमान सय्यद अली सय्यद,रावसाहेब पिंपळे,सुखदेव पोकळे,महादेव दगडु भवर,गणेश आंबेकर.

### पत्रकारिता क्षेत्र

जावेद गफुरखान पठाण, संतोष सानप,अशोक शिंदे, हरीदास शेलार,अजय जोशी, शितलकुमार मोटे,सुरेश जाधव, आण्णासाहेब साबळे, गहिनीनाथ पाचबैल, विनोद जिरे.

### शिक्षण क्षेत्र  (माध्यमिक व  उच्च माध्यमिक)

अर्जुन घुगे,प्रा. अजित इथापे,  कल्याण वाल्हेकर,संजय सोले,रविंद्र फुंदे, शामसुंदर घाडगे,आत्माराम बारवकर, मुकुंद लगड,सुहास साळवे, सुधाकर गर्जे,श्रीमती निता आघाव,राजु सानप,भानुदास आविळे,श्रीमती सुजाता जाधव,अशोक इथापे,बारामते तुकाराम,श्रीमती शेख मिनाज सिकंदर,पद्माकर गर्जे,श्रीमती चंद्रकला शाहुराव लाड,श्रीमती सारिका सुर्यभान घाटोळे,सुरेश तळेकर,श्रीमती सायली अनंत चौधरी यांचा समावेश आहे.

# नॅशनल कॉल अ फ्रेंड डे चे समाजशास्त्रीय महत्त्व

**मानवी समाजरचनेचा केंद्रबिंदू म्हणजे नातेसंबंध होय. माणूस जन्माला येतो तो केवळ जैविक अस्तित्व म्हणून नव्हे, तर सामाजिक अस्तित्व म्हणून. कुटुंब, नातेवाईक, समाज, संस्था आणि विविध सामाजिक गट यांच्याशी असलेल्या परस्परसंबंधांतूनच त्याची ओळख, मूल्यव्यवस्था आणि जीवनदृष्टी घडत असते. या सर्व नात्यांमध्ये मैत्रीचे स्थान अत्यंत वेगळे आणि अर्थपूर्ण आहे. मैत्री ही कोणत्याही औपचारिक बंधनांवर आधारलेली नसून स्वेच्छेने, समतेच्या आणि विश्वासाच्या पायावर उभी राहिलेली नाती असतात. २८ डिसेंबर रोजी साजरा होणारा 'नॅशनल कॉल अ फ्रेंड डे' हा दिवस या मैत्रीच्या नात्यांचे स्मरण करून देतो आणि आधुनिक समाजातील संवादाच्या तुटवड्यावर समाजशास्त्रीय दृष्टीने विचार करण्याची संधी देतो.**

समाजशास्त्र माणसाला 'सामाजिक प्राणी' मानते. व्यक्तीचे विचार, भावना, वर्तन आणि जीवनशैली ही समाजातील सततच्या संवादातूनच घडत असते. या प्रक्रियेत मित्रांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे ठरते. मित्र हा असा सामाजिक आधार असतो की ज्याच्यासमोर व्यक्ती कोणताही मुखवटा न घालता स्वतःला व्यक्त करू शकते. कुटुंबातील किंवा औपचारिक सामाजिक चौकटीतील मर्यादांपलीकडे जाऊन मित्राशी संवाद साधता येतो. त्यामुळे मैत्री ही व्यक्तीच्या भावनिक सुरक्षिततेसाठी आणि मानसिक आरोग्यासाठी एक महत्त्वाची सामाजिक संस्था ठरते. 'नॅशनल कॉल अ फ्रेंड डे' हा दिवस या संस्थेचे महत्त्व समाजाला पुन्हा जाणवून देतो.

आधुनिक काळात मानवी जीवन अधिक गतिमान, स्पर्धात्मक आणि ताणतणावपूर्ण झाले आहे. शहरीकरण, औद्योगिकीकरण, जागतिकीकरण आणि व्यक्तिकेंद्रित जीवनशैलीमुळे माणूस अधिकाधिक व्यस्त आणि एकाकी होत चालला आहे. तंत्रज्ञानाने संवादाची साधने प्रचंड वाढवली असली, तरी संवादाची खोली कमी होत असल्याचे समाजशास्त्रीय अभ्यासातून दिसून येते. सोशल मीडिया, व्हॉट्सअॅप संदेश किंवा इमोजी यांच्या माध्यमातून संपर्क राहतो; पण मन मोकळे करून बोलण्याची सवय कमी होत आहे. अशा पार्श्वभूमीवर मित्राला फोन करून प्रत्यक्ष संवाद साधणे ही कृती केवळ तांत्रिक नसून सामाजिक आणि भावनिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाची ठरते. 'नॅशनल कॉल अ फ्रेंड डे' हा दिवस या डिजिटल दुराव्याला छेद देणारा मानवी संदेश देतो.

समाजशास्त्रातील 'सामाजिक भांडवल' ही संकल्पना नातेसंबंधांचे सामर्थ्य स्पष्ट करते. विश्वास, परस्पर सहकार्य, संवाद आणि सामाजिक नेटवर्क्स यांचा एकत्रित परिणाम म्हणजे सामाजिक भांडवल. मित्रपरिवार हा या सामाजिक भांडवलाचा एक महत्त्वाचा स्रोत आहे. अडचणीच्या काळात मित्र मदतीला येतात, भावनिक आधार देतात आणि जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करतात. अनेक वेळा मित्राशी केलेला संवाद हा उपचारासारखा ठरतो. 'नॅशनल कॉल अ फ्रेंड डे' हा दिवस या सामाजिक भांडवलाचे जतन आणि संवर्धन करण्याचे महत्त्व अधोरेखित करतो.

मानसिक आरोग्याच्या संदर्भात या दिवसाचे महत्त्व अधिक ठळकपणे जाणवते. आजच्या समाजात तणाव, नैराश्य, चिंता, असुरक्षितता आणि एकटेपणा या समस्या झपाट्याने वाढत आहेत. समाजशास्त्रीय आणि मानसशास्त्रीय अभ्यासानुसार सामाजिक अलगाव हा मानसिक आजारांचा एक प्रमुख कारणीभूत घटक आहे. विशेषतः विद्यार्थी, स्थलांतरित कामगार, शहरी नोकरदार वर्ग आणि वृद्ध यांना या समस्यांचा अधिक सामना करावा लागतो. अशा वेळी मित्राचा साधा फोन कॉलही एखाद्या व्यक्तीसाठी आधारवड ठरू शकतो. 'कोणी तरी आपल्याशी संवाद साधते आहे' ही भावना माणसाला मानसिक बळ देते. 'नॅशनल कॉल अ फ्रेंड डे' हा दिवस समाजाला या संवेदनशील वास्तवाची जाणीव करून देतो.

भारतीय समाजात मैत्रीची संकल्पना प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. ग्रामीण समाजात शेजारी, सहकारी, बालसवंगडी यांच्यातून मैत्री विकसित होत असे. सामूहिक जीवनपद्धतीमुळे संवाद, सहवास आणि परस्परावलंबन अधिक होते. मात्र आधुनिक काळात विभक्त कुटुंब पद्धती, स्थलांतर, शिक्षण आणि नोकरीच्या संधींमुळे नात्यांमध्ये दुरावा निर्माण झाला आहे. अनेकदा बालपणीचे किंवा तरुणपणीचे मित्र काळाच्या ओघात संपर्काबाहेर जातात. 'नॅशनल कॉल अ फ्रेंड डे' हा दिवस या विस्मरणात गेलेल्या नात्यांना पुन्हा उजाळा देण्याची संधी देतो.

पिढ्यान्पिढ्यांतील नातेसंबंधांच्या संदर्भातही या दिवसाचे महत्त्व आहे. जुने मित्र म्हणजे केवळ व्यक्ती नव्हे, तर आपल्या जीवनातील आठवणी, अनुभव आणि सामाजिक इतिहास असतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, अशी नाती जपणे म्हणजे सामाजिक स्मृती जपणे होय. मित्राला केलेला फोन हा भूतकाळ आणि वर्तमान यांना जोडणारा सेतू ठरतो. त्यामुळे 'नॅशनल कॉल अ फ्रेंड डे' हा दिवस सामाजिक सलगतेचे प्रतीक ठरतो.

स्त्री-पुरुष मैत्री, आंतरजातीय, आंतरधर्मीय आणि विविध सांस्कृतिक पार्श्वभूमीतील मैत्री समाजातील समता, सहिष्णुता आणि सलोखा वाढवण्यास मदत करतात. समाजशास्त्र मानते की



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**

वैयक्तिक पातळीवरील संवाद आणि मैत्रीमुळे सामाजिक भिंती, पूर्वग्रह आणि भेदभाव कमी होऊ शकतात. एका साध्या संवादातून परस्पर समज वाढते आणि सामाजिक ऐक्य मजबूत होते. 'नॅशनल कॉल अ फ्रेंड डे' हा दिवस या व्यापक सामाजिक ऐक्याचा विचार करण्यास प्रवृत्त करतो.

कामाच्या ठिकाणी असलेली मैत्रीही समाजशास्त्रीय दृष्ट्या महत्त्वाची आहे. सहकाऱ्यांमधील मैत्रीमुळे कार्यस्थळी सकारात्मक वातावरण निर्माण होते, तणाव कमी होतो आणि परस्पर सहकार्य वाढते. अनेक संशोधनांतून असे स्पष्ट झाले आहे की ज्या संस्थांमध्ये मानवी संबंध सुदृढ असतात, त्या संस्था अधिक स्थिर आणि कार्यक्षम ठरतात. त्यामुळे हा दिवस वैयक्तिक आयुष्यापुरता मर्यादित न राहता सामाजिक आणि व्यावसायिक जीवनातील संवादाचे महत्त्व अधोरेखित करतो.

वृद्धांच्या आयुष्यात संवाद आणि मैत्रीचे स्थान अधिक संवेदनशील आहे. विभक्त कुटुंब पद्धती, शहरी जीवनशैली आणि स्थलांतरामुळे अनेक वृद्ध एकटे पडलेले दिसतात. त्यांच्या आयुष्यात मित्राचा फोन कॉल हा आनंद, आठवणी आणि आपुलकीचा स्रोत ठरतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, वृद्धांचे सामाजिक एकाकीपण कमी करणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. 'नॅशनल कॉल अ फ्रेंड डे' हा दिवस या जबाबदारीची जाणीव करून देतो.

एकूणच, 'नॅशनल कॉल अ फ्रेंड डे' हा दिवस केवळ औपचारिक साजरा करण्यापुरता मर्यादित न ठेवता, मानवी नातेसंबंधांचे पुनर्मूल्यांकन करण्याची संधी देतो. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, मजबूत समाजाची उभारणी ही संवाद, विश्वास आणि आपुलकीवर आधारलेली असते. जेव्हा माणसे एकमेकांशी संवाद साधतात, तेव्हा समाज अधिक संवेदनशील, समतोल आणि मानवी बनतो. म्हणूनच २८ डिसेंबर हा दिवस आपण केवळ मित्राला फोन करण्याचा दिवस न मानता, नात्यांना पुन्हा जिवंत करण्याचा, संवाद वाढवण्याचा आणि समाज अधिक मानवी बनवण्याचा संकल्प म्हणून स्वीकारायला हवा. एका साध्या फोनकॉलमधूनही नाती घट्ट होऊ शकतात आणि समाजात सकारात्मक परिवर्तन घडू शकते. हीच 'नॅशनल कॉल अ फ्रेंड डे'ची खरी समाजशास्त्रीय जाणीव आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड  (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)




# दैनिक अतुल्य महाराष्ट्र






# परळी शहर व तालुका पत्रकार संघाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सिरसाळ्यात भव्य सत्कार संपन्न



## रामदादा किरवले यांनी पत्रकारितेची सामाजिक जबाबदारी, मूल्यनिष्ठा व लोकशाहीतील माध्यमांची भूमिका यावर मोलाचे मार्गदर्शन केले

**सिरसाळा | प्रतिनिधी (अतुल बडे)**

परळी तालुका पत्रकार संघाची नूतन कार्यकारणी जाहीर होताच सिरसाळा येथे पत्रकारितेच्या सन्मानाचा आणि सामाजिक बांधिलकीचा सुंदर संगम पाहायला मिळाला. आदर्श सिरसाळा पत्रकार संघ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २७ डिसेंबर रोजी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा भव्य सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.

यावेळी तालुकाध्यक्ष रानबा गायकवाड, तालुका कार्याध्यक्ष नितीन ढाकणे, तालुका सहसचिव शेख मुदस्सीर तसेच सल्लागार भगवान साकसमुद्रे यांचा सत्कार करण्यात आला

नवीन कार्यकारणीत तालुका उपाध्यक्ष म्हणून अनुप कुसुमकर व सय्यद सबाहत अली, तालुका सचिव म्हणून दैनिक बीड चौफेरचे बालाजी ढगे, तर सहसचिव म्हणून शेख मुदस्सीर यांची निवड करण्यात आली आहे.

शहर संघटनेत शहर उपाध्यक्ष समीर इनामदार, शहर सचिव दैनिक रणझुंजारचे संतोष जुजगर आणि सहसचिव दैनिक लोकमत समाचारचे शेख अफसर यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. कार्यकारणी सदस्य म्हणून दैनिक गावकरीचे जगदीश शिंदे, दैनिक जंग बीडचे बाबा शेख, अमोल सूर्यवंशी व मुंबई जंगचे संपादक बालासाहेब मुजमुले यांची निवड करण्यात आली आहे. तसेच सल्लागार म्हणून ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मण वाकडे, धनंजय आरबुने, जगदीश शिंदे व भगवान साकसमुद्रे आदींची नियुक्ती करण्यात आली.

या प्रसंगी पत्रकार सहकारी नितेश भैय्या काळे यांचा वाढदिवस असल्याने त्यांचाही विशेष सत्कार करून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.

कार्यक्रमास सिरसाळा पत्रकार संघाचे डॉ. जे. एन. शेख, मिलिंद चोपडे, जावेद पठाण, रमेश लहाने, रफिक पठाण, नितेश काळे, अतुल बडे यांची उपस्थिती होती. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अच्युत बप्पा किरवले, मार्गदर्शक रामदादा किरवले, सचिव सुभाष जिजा चोपडे, सल्लागार प्रा. दयानंद झिंजुर्डे, प्रकाश चोपडे सर, दिलीप मिसाळ, रोहिदास आरसुळे, वैजनाथ किरवले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात रानबाजी गायकवाड व रामदादा किरवले यांनी पत्रकारितेची सामाजिक जबाबदारी, मूल्यनिष्ठा व लोकशाहीतील माध्यमांची भूमिका यावर मोलाचे मार्गदर्शन केले. सत्कार समारंभाचे सूत्रसंचालन पत्रकार मिलिंद चोपडे यांनी केले.

# शिक्षकांच्या विभागीय स्वरचित काव्यवाचन स्पर्धा संपन्न

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**



महाराष्ट्र शासन शिक्षण विभाग व राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद पुणे आणि जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षकांसाठी स्वरचित विभागीय काव्यवाचन स्पर्धा नुकत्याच संपन्न झाल्या. या स्पर्धेत संपूर्ण मराठवाड्यातून हौशी काव्यवाचक शिक्षक मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते. ही स्पर्धा मोदी लर्निंग सेंटर अंबाजोगाई येथे पार पडली. या स्पर्धेचे उद्घाटन प्रसिद्ध गजलकार प्रा. मुकुंद राजपंखे यांच्या हस्ते झाले. या उद्घाटन समारंभ प्रसंगी व्यासपीठावर वरिष्ठ अधिव्याख्याता जयपाल कांबळे , शिक्षक मैत्री प्रतिष्ठान अंबाजोगाई चे अध्यक्ष विजय रापतवार ,मराठवाडा साहित्य परिषदेचे सचिव गोरख शेंद्रे , मधली सुट्टी च्या लेखिका श्रीमती संध्या सोळंके , प्रसिद्ध वात्रटिकाकार भागवत मसने हे उपस्थित होते .

या स्पर्धेत मराठवाड्यातून आलेल्या सर्व काव्यवचक शिक्षक बांधवांचे शब्दसुमनांनी स्वागत करत शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार यांनी ही स्पर्धा आयोजित करण्यामागील कल्पना विशद केली. अध्यक्षीय समारोप करतांना सुप्रसिद्ध गझलकार प्रा मुकुंद राजपंखे यांनी आपल्या खुमासदार शैलीत कविता व गझल सादर करत आलेल्या सर्व कवींमध्ये उत्साह वाढवला . या शिक्षक काव्यवाचन स्पर्धास शिक्षक मैत्री प्रतिष्ठान अंबाजोगाई व बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ अंबाजोगाई यांचे बहुमोल सहकार्य लाभले . स्पर्धेमध्ये औरंगाबाद विभागातील सर्व जिल्ह्यातून आलेल्या शिक्षकांनी बहारदार कविता सादरीकरण केले. या कार्यक्रमाचा आस्वाद उपस्थित शिक्षकांसह सर्व रसिक श्रोत्यांनी मोठ्या उत्साहाने घेतला.यात विशेष करून शिक्षकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद नोंदवला. शिक्षकांना आपली अभिव्यक्ती व्यक्त करण्यासाठी शिक्षण विभागाने सुरू केलेल्या २९ स्पर्धांपैकी ही एक विभागस्तरीय स्पर्धा होती.

या स्पर्धेत परीक्षकांनी अंतिम परीक्षणाअंती पाच कवींची निवड राज्यस्तरावर केली.या निवड झालेल्या पाचही कवींचा आयोजकाच्या वतीने पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.पुरस्कार वितरण प्रसंगी व्यासपीठावर शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे सचिव विष्णू सरवदे, अधिव्याख्याता डॉ योगेश सुरवसे शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री विजय रापतवार परीक्षक गोरख शेंद्रे, भागवत मसने, श्रीमती संध्या सोळंके इत्यादी उपस्थित होते .या स्पर्धेसाठी साधन व्यक्ती गणेश वेदपाठक , विजय कचरे, बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्य श्रीमती कुलकर्णी व त्यांचे कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. तर प्राध्यापक जयस्वाल यांनी उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व कवी व रसिक श्रोत्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

# महावितरणच्या ढिसाळ कारभारामुळे शेतकरी हवालदिल

## बेलंबा ११ के.व्ही. फीडरवरील वीजपुरवठा सुरळीत करावा शेतकऱ्याची मागणी; आंदोलनाचा कडक इशारा : किशोर गित्ते

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**



परळी तालुक्यातील बेलेश्वर फिटर अंतर्गत बेलंबा ११ के.व्ही. फीडरवरून कौठळी, इंजेगाव व परिसरातील शेतकऱ्यांना केवळ सकाळी चार तासच वीजपुरवठा मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष पसरला आहे. महावितरणच्या या अपुऱ्या आणि अनियमित वीजपुरवठ्यामुळे संपूर्ण शेती व्यवस्था कोलमडण्याच्या मार्गावर आहे.

सध्या रब्बी हंगाम सुरू असून ऊस लागवड, गहू लागवड तसेच भाजीपाला व इतर पिकांना नियमित पाण्याची अत्यंत गरज आहे. मात्र चार तासांच्या अपुऱ्या वीजपुरवठ्यावर मोटारी चालवून पिकांना पाणी देणे अशक्य झाले आहे. परिणामी शेतकऱ्यांची पिके करपण्याच्या मार्गावर असून मोठ्या आर्थिक नुकसानीची भीती निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे, अनेक शेतकऱ्यांनी महावितरण कार्यालयात तक्रारी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. दिवसा वीजपुरवठा न मिळाल्याने रात्रीच्या वेळी पाणी देण्याचा धोका वाढत असून शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. "वीज आहे म्हणून शेती, शेती आहे म्हणून जगणं" असे म्हणणाऱ्या शेतकऱ्यांच्या पदरी मात्र महावितरणकडून अनास्था व दुर्लक्ष येत असल्याची भावना व्यक्त होत आहे. शासन एकीकडे शेतकऱ्यांच्या हिताच्या योजना जाहीर करत असताना प्रत्यक्षात मात्र मूलभूत गरज असलेल्या वीजपुरवठ्यापासून शेतकरी वंचित असल्याचे चित्र दिसत आहे. यामुळे परळी महावितरणने तात्काळ बेलंबा ११ के.व्ही. फीडरवरील वीजपुरवठा सुरळीत करून शेतकऱ्यांना दिवसा व नियमित वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. अन्यथा महावितरण कार्यालयासमोर तीव्र आंदोलन, रास्ता रोको व घेराव करण्याचा इशारा शेतकऱ्यांच्या वतीने देण्यात आला आहे. जर लवकरात लवकर निर्णय न घेतल्यास या आंदोलनाची जबाबदारी संपूर्णपणे महावितरण प्रशासनावर राहील, असेही शेतकऱ्यांनी स्पष्ट केले आहे. आता महावितरण प्रशासन शेतकऱ्यांच्या या गंभीर मागण्यांकडे गांभीर्याने पाहते की पुन्हा दुर्लक्ष करते, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# रेणापूर कृऊबा कॉँग्रेसचे संचालक अशोक राठोड यांचा आ. रमेशअप्पा कराड यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश

**लातूर | प्रतिनिधी**



रेणापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक कॉँग्रेस कार्यकर्ते अशोक रामराव राठोड यांनी भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शनिवारी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.

लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात शनिवारी सकाळी रेणापूर तालुक्यातील मौजे फरदपूर येथील बंजारा समाजातील कॉँग्रेसचे कार्यकर्ते रेणापूर बाजार समितीचे संचालक अशोक रामराव राठोड यांनी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी माजी आमदार ॲड. त्र्यंबकनाना भिसे, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, माजी सभापती अनिल भिसे, भाजपाचे मंडल अध्यक्ष शरद दरेकर, सुरज शिंदे, प्रताप पाटील, फरदपूरचे सरपंच बालाजी राठोड, गरसुळीचे सरपंच अजय राठोड, माजी सभापती विजय चव्हाण, प्रवीण कोतवाल, संजय ठाकूर, नारायण राठोड, गणेश चव्हाण, उत्तम चव्हाण, श्रीमंत नागरगोजे, सुभाष राठोड, प्रकाश राठोड, राजसंघ राठोड यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

रेणापूर तालुक्यासह संपूर्ण लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी शासनाच्या विविध योजनेच्या माध्यमातून गावागावात वाडी वस्तीत मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करून विकास कामांना गती दिली. सर्वत्र होत असलेल्या विकास कामांना प्रेरित होऊन मतदार संघातील अनेकजण आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीत प्रवेश करत आहेत. येणाऱ्या काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत लातूर ग्रामीण मतदारसंघात शतप्रतिशत भाजपा करण्यासाठी भाजपाचे कार्यकर्ते प्रयत्नशील आहे.

# कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गुलाब जाधव पदावरून पायउतार!

**महागाव | प्रतिनिधी**



तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गुलाब लोभा जाधव यांचे विरूद्ध कृषी उत्पन्न बाजार समितीच्या १८ पैकी १६ संचालकाच्या वतीने जिल्हा अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रात अविश्वास ठराव दाखल करण्यात आला होता अखेर जिल्हा अधिकारी यांच्या आदेशानुसार पीठासन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्री सखाराम मुळे साहेब यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सभेत १५ विरूद्ध शुन्य मतांनी अविश्वास ठराव मंजूर करण्यात आला असून हा अविश्वास ठराव महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी -विक्री (विकास व विनिमयन) अधिनियम १९६३ च्या कलमं २३ (अ) अंतर्गत सादर करण्यात आला होता.सबंधीत कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीवर अविश्वास ठराव दाखल करण्याचे कारण म्हणजे बाजार समितीच्या कामात मनमानी, संचालकांना विश्वासात न घेणे,आर्थिक निर्णयातील पारदर्शकतेचा अभाव,मासिक सभेत चर्चा न करता परस्पर आदेश काढणे,तसेच बहुमताने मंजूर ठरावाची अंमलबजावणी न करणे भोवल्याने अखेर आज दिनांक २६ डिसेंबर रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयात १५ विरूद्ध शुन्य मतांनी अविश्वास ठराव मंजूर झाल्याने कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गुलाब जाधव यांना पदावरून पायउतार व्हावे लागले. यावेळी रामेश्वर करपे, गजेंद्र देशमुख, वासुदेव नेवारे, किशोर देशमुख,विनोद राउत, कृष्ण राउत, निरंजन धनगर,रवि पवार (कोदंरी) उकंडा राठोड, पुंडलिक भुरके, परमेश्वर जाधव,विजय कृष्णापुरे, रितेश पुरोहित,विनोद भगत,सौ. पुष्पाताई ठाकरे यांच्यासह आदी संचालक उपस्थित होते.